MHKO070024252025

**किरकोळ दिवाणी अर्ज क्र.५४/२०२५**

**नि.क्र.१ वरील आदेश**

**सुभाष बाबगोंडा पाटील वगैरे १**

**वि.**

**कोणीही नाही**

प्रस्तुतचा अर्ज अर्जदार यांनी ते मयत धनगोंडा बाबगोंडा पाटील यांचे वारस असल्याबाबत वारसा दाखला (Heirship Certificate) मिळण्यासाठी दाखल केलेला आहे.

०२. अर्जदार नं.१ यांचे सख्खे बंधू तसेच अर्जदार नं.२ यांचे सख्खे दिर धनगोंडा बाबगोंडा पाटील हे दि.०२.०९.२०१९ रोजी इ.रोजी उदगांव, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर येथे मयत झालेले आहेत. तसेच अर्जदार नं.१ यांचे वडील बाबगोंडा तसेच आई इंद्राबाई म्हणजेच अर्जदार नं.२ यांचे सासू सासरे पूर्वीच मयत झालेले आहेत. धनगोंडा बाबगोंडा पाटील यांना अर्जदार नं.१ व २ यांचे खेरीज अन्य कोणीही सरळ व कायदेशीर वारस नाहीत.

०३. मयत धनगोंडा बाबगोंडा पाटील हे खाजगी नोकरी करीत होते. त्यांचे पश्चात शासकीय व निमशासकीय दप्तरी दाखल करणेकामी अर्जदार हे धनगोंडा बाबगोंडा पाटील यांचे सरळ व कायदेशीर वारस असलेबाबतचा अर्जदार

यांना मे.कोर्टाकडील औपचारीक वारसा दाखलेची आवश्यकता आहे. त्यामुळे अर्जदारांना सदरचा अर्ज दाखल करावा लागत आहे.

**०४.** अर्ज व अर्जासोबत दाखल केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले. अर्जदारतर्फे विधिज्ञ यांचा युक्तिवाद ऐकला. प्रस्तुत अर्जाचे निर्गतीकरिता खालीलप्रमाणे मुद्दे उपस्थित झाल्यामूळे त्यांच्या कारणमिंमांसेसह त्याचे उत्तर खालीलप्रमाणे नमूद करत आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अर्जदार हे मागणी केल्याप्रमाणे वारस दाखला (Heirship Certificate) मिळणेस पात्र आहेत का ? | ... अंशतः होय. केवळ अर्जदार क्र.१ |
| २. | काय आदेश ? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## <u>का र ण मी मां सा</u>

**<u>मुद्दा क्रमांक १ व २ बाबत</u> :–**

**०५.** अर्जदार क्र.१ यांनी त्यांचे प्रतिज्ञापत्र **नि.क्र.१०** अन्वये दाखल केले आहे. अर्जदार यांनी आपल्या अर्जातील कथनांना पुष्टी देण्यासाठी अर्जदार यांनी मयत धनगोंडा बाबगोंडा पाटील यांच्या मृत्यू प्रमाणपत्राची व्हेरीफाईड प्रत **नि.क्र.१२** वर दाखल केलेली आहेत. तसेच नि.क्र.१५/१ ला इंद्राबाई बाबगोंडा

पाटील यांच्या मृत्युप्रमाणपत्राची छायांकित प्रत दाखल केलेली आहे. अर्जदार यांनी पुरावा बंद ची पुरसीस **नि.क्र.११** वर दिलेली आहे.

**०६.** सदर प्रकरणात अर्जदार यांनी दैनिक जनप्रवास **(नि.क्र.१३)** या वर्तमानपत्रामध्ये दिनांक ०९/१२/२०२५ रोजी जाहीरनामा काढून हरकती मागविण्यात आल्या. तसेच जाहिर नोटीस **नि.क्र.७** नुसार मयताचे घरी अर्जदार यांचे पत्यावर, गावचावडी कार्यालय उदगांव यांचे कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर, सह दिवाणी न्यायालय जयसिंगपूर यांच्या नोटीस बोर्डावर प्रसिद्ध करण्यात आल्या. सदर जाहीरनामा व जाहीर नोटीसीच्या प्रसिद्धी नंतरही आजपावेतो इतर कोणीही अर्जदार हे धनगोंडा बाबगोंडा पाटील यांचे वारस नाहीत अशी हरकत उपस्थित केलेली नाही. सदर जाहीरनाम्यामध्ये दिलेल्या मुदतीत कोणीही हरकतदार हजर झाले नाहीत. त्यामुळे सदर प्रकरण विनाहरकत, विनाउत्तर राहिले आहे.

**०७.** अर्जदार यांनी त्यांचे प्रतिज्ञापत्र **नि.क्र.१०** अन्वये दाखल केले आहे. त्यांनी त्यामध्ये मयत धनगोंडा बाबगोंडा पाटील यांचे अर्जदार क्र.१ हे नात्याने भाऊ तर अर्जदार क्र.२ यांचे मयत धनगोंडा बाबगोंडा पाटील नात्याने सख्खे दिर या नात्याने वारस आहेत. मात्र हिंदू वारसा कायदा १९५६ चे कलम ८ मधील नमुद असलेल्या वर्ग–१ चे वारसाचे अवलोकन केले असता त्यामध्ये अर्जदार क्र.१ व २ हे वर्ग–१ चे वारस होत नाहीत. परंतु अर्जदार नं.१ हे मयत धनगोंडा बाबगोंडा पाटील यांचे सख्खे भाऊ असल्याने तेच मयताचे वर्ग २ चे वारस होतात. अर्जदार क्र.२ यांचा मयताशी नातेसंबंध पाहता तसेच हिंदू वारसा कायदा मधील वर्ग २ मध्ये नमुद असलेल्या वारसांचे अवलोकन करता अर्जदार

क्र.२ या मयताच्या वारस असल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे केवळ अर्जदार क्र.१ हे मयत धनगोंडा बाबगोंडा पाटील यांचे सख्खे भाऊ असल्याने ते त्यांच्या नांवे मयत धनगोंडा बाबगोंडा पाटील यांचे वारस म्हणून वारस प्रमाणपत्र मिळवणेस पात्र आहेत.

०८. अर्जदार क्र.१ हे मुंबई नियमन कायदा १८२७ च्या विनियम ८ अन्वये वारसा दाखला मिळण्यास पात्र ठरतात. सदरील अर्जानुसार कोणत्याही व्यक्तीचे कोणत्याही मिळकती संदर्भात हक्क व अधिकार ठरविण्यात येत नाहीत. मे. मुंबई उच्च न्यायालयाने अनेक निवड्यामध्ये वारसा प्रमाणपत्र हे फॉर्मल रिकग्निशन (formal) असल्याचे म्हटलेले आहे. म्हणून सदरचा अर्ज मंजुर करण्यात येवून खालील आदेश पारीत करण्यात येतो.

## आ दे श

| | |
|---|---|
| १. | अर्जदार यांचा प्रस्तुतचा अर्ज अंशतः मंजूर करण्यात येतो. |
| २. | केवळ अर्जदार नं.१ सुभाष बाबगोंडा पाटील हे मयत धनगोंडा बाबगोंडा पाटील यांचे कायदेशीर वारस असल्याचे घोषित करण्यात येते. |
| ३. | अर्जदार नं.१ हे वर नमूद केलेप्रमाणे वारस असल्याने त्यांना त्यांचे नांवे मुंबई नियमन कायदा १८२७ च्या विनियम ८ नियम २ व ३ प्रमाणे व परिशिष्ठ ब मधील विहीत नमुन्यामध्ये योग्य ते न्यायालयीन शुल्क आकारुन वारसा प्रमाणपत्र (Heirship |

| | |
|---|---|
| | Certificate) देण्यात यावे. |
| ४. | वारसा प्रमाणपत्रावर दिवाणी नियमावलीचा परिच्छेद क्रमांक ३१२ मधील टीप नोंदवावी. |

PATIL MAYUR SAMPAT Digitally signed by PATIL MAYUR SAMPAT Date: 2026.05.08 15:39:48 +0530

जयसिंगपूर.

दिनांक – ०८/०५/२०२६

**( एम. एस. पाटील )**

२ रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर

जयसिंगपूर, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर